# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/५००८२ /२०१९

पुणे शहर दिनांक२८/०८/२०१९

पुणे शहरातील कोथरुड वाहतुक विभागाचे हद्दीत नळस्टॉप चौक या ठिकाणी मेट्रोचे काम मोठ्या प्रमाणात चालु आहे. दिनांक ०२/०९/२०१९ ते १३/०९/२०१९ पर्यत गणेश उत्सव असल्याने कोथरुड वाहतुक विभागाच्या हद्दीमध्ये जड वाहनांना बंदी (ट्रक, खाजगी लक्झरी बस, एस टी बसेस, शिवनेरी, शिवशाही) करणे आवश्यक आहे. दिनांक ०१/०९/२०१९ पासुन दिनांक १५/०९/२०१९ पर्यंत पुढील आदेशापर्यंत प्रायोगिक तत्वावर वाहतुकीत बदल करणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी पंकज देशमुख, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, त्या अनुषंगाने कोथरुड वाहतुक विभागातील वाहतुकीत खालीलप्रमाणे तात्पुरते बदल करण्यात येत आहे

- **चांदणी चौकाकडुन कोथरुडकडे येण्यास जड वाहनांना (ट्रक, खाजगी लक्झरी बस, एस टी बसेस, शिवनेरी, शिवशाही) यांना मनाई करण्यात येत आहे. त्यांनी नवले ब्रीज, सिंहगड रोड सरळ मुबंई बेंगलोर हायवे रोडने जावे. कात्रज मार्गे स्वारगेट, शिवाजीनगर व डेक्कन कडुन येणा-या जड वाहने ही नळस्टॉप कोथरुड भागात न येता त्यांनी लालबहादुर शास्त्री रोडने सिंहगड रोडवरुन इच्छित स्थळी जावे.**

**सही/-**
**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक**
**पुणे शहर**

प्रत :-

१) **पोलीस निरिक्षक**, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर.
२/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

Scanned by CamScanner